# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग
कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १८५५ दि.०२/०७/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडाच्या घरांसाठी कोविड काळातही मोठा प्रतिसाद हे सामान्य जनतेचा 'म्हाडा'वर विश्वास असल्याचे द्योतक - उपमुख्यमंत्री अजित पवार

म्हाडा पुणे मंडळाच्या २ हजार ९०८ सदनिकांसाठी संगणकीय सोडत उत्साहात

सध्या कोरोनाच्या संकटाचा काळ सूरु आहे. या संकटाच्या काळातही म्हाडाच्या २ हजार ९०८ घरांसाठी सुमारे ४७ हजार जणांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत. घरांसाठी इतक्या मोठया प्रमाणात मिळालेला प्रतिसाद हा सामान्य लोकांचा 'म्हाडा'वर विश्वास असल्याचे द्योतक आहे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी राज्यातील सामान्य जनतेचा हाच विश्वास 'म्हाडा'ने यापुढेही जपण्याचे, वाढविण्याचे आवाहन आज केले.

म्हाडा पुणे मंडळातर्फे आज पुणे जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीतील शरदचंद्र पवार सभागृहात विविध गृहनिर्माण योजनेतील २ हजार ९०८ सदनिकांसाठी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते संगणकीय सोडत काढण्यात आली. या कार्यक्रमप्रसंगी श्री. पवार बोलत होते. यावेळी पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई पानसरे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आयुष प्रसाद, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन माने आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले, मुंबई, पुण्यासारख्या शहरात आपलेही एक घर असावे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. प्रत्येकजण हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत असतो. म्हाडाच्या लॉटरीत घरांसाठी अर्ज करणे हा सुध्दा या प्रयत्नाचाच एक भाग आहे. मात्र, आजच्या सोडतीत २ हजार ९०८ घरं असल्याने तितक्याच अर्जदारांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. या सोडतीत यश न मिळाल्यास निराश न होता म्हाडाच्या पुढील सोडतीत सहभागी होऊन प्रयत्न करावेत. प्रत्येकाचे प्रत्येकाचे घर घेण्याचे स्वप्न एक ना एक दिवस नक्की पूर्ण होईल. आजची सोडत सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घर या योजनेतील उद्दीष्टपूर्तीच्या दिशेने पडलेले एक आश्वासक पाऊल आहे. म्हाडाचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे सुरु असून पुणे शहराच्या विकासासाठी 'म्हाडा'ने आणखी योगदान देण्याचे आवाहनही उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी यावेळी केले. यावेळी उपमुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते एप्रिल-२०२१ मध्ये काढण्यात आलेल्या सोडतीतील निवडक पात्र विजेत्या अर्जदारांना प्रातिनिधीक स्वरुपात घराच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले.

आज काढण्यात आलेल्या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) योजनेअंतर्गत पुणे जिल्हयातील म्हाळूंगे (चाकण) येथे २०९, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे ४३२

अशा एकूण ६४१ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत अल्प उत्पन्न गटासाठी मोरवाडी पिंपरी (पुणे) येथे १४ सदनिका तर मध्यम उत्पन्न गटासाठी मोरवाडी पिंपरी येथे २ सदनिकांचा या सोडतीत समावेश होता.

२० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत अल्प उत्पन्न गटासाठी पुणे महानगर पालिका हद्दीतील लोहगाव, बाणेर, हडपसर, धनकवडी, खराडी, वडगाव शेरी, येवलेवाडी येथील ३०० सदनिकांचा समावेश होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपळे निलख, ताथवडे, किवळे, पुनावळे, मोशी, वाकड, रावेत,  रहाटणी, चरोली, चिखली, उरवडे, डुडुळ गाव येथील ४५५ सदनिकांचा सोडतीत समावेश करण्यात आला.

प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत उच्च उत्पन्न गटासाठी जुळे सोलापूर येथे ५ सदनिका, मध्यम उत्पन्न गटासाठी जुळे सोलापूर येथे ६३ सदनिका, चाकण-म्हाळुंगे-इंगळे येथे ४९९ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अल्प उत्पन्न गटासाठी चाकण-म्हाळुंगे-इंगळे, चिखली येवलेवाडी, वडमुखवाडी येथे ८६२ सदनिकांचा सोडतीत समावेश होता.

अत्यल्प उत्पन्न गटासाठी चाकण-म्हाळुंगे-इंगळे येथे ६७ सदनिकांसाठीही आज सोडत काढण्यात आली.






MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
PUNE BOARD LOTTERY MAY -2021
Scheme - 456 PALM-SPRING-WAKAD
GENERAL PUBLIC
SCHEDULED CASTE
SCHEDULED TRIBES
NOMADIC TRIBES
DENOTIFIED TRIBES
JOURNALIST
GENERAL PUBLIC , Total Tenements - 18
Winners
महाराष्ट्र शासन (गृहनिर्माण विभाग)


MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
म्हाडा
MHADA
ऑनलाईन सोडत - जुलै २०२१
उत्कृष्ट दर्जा...वाजवी किंमत...
पारदर्शक व्यवहार


SCHEME : 456-PALM-SPRING-WAKAD
CATEGORY : ME-MHADA EMPLOYEE
WINNER LIST
Application Number
Applicant Name
Flat
Applicant Photo
-, A, 10,
1004
म्हाडा
MHADA
ऑनलाईन सोडत - जुलै २०२१